अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. ८ नोव्हेंबर २०२५ । वर्ष : २४ वे अंक : ४० वा किंमत : ५ रुपये पाने १२

## ट्रॅक्टरला धडकल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू

सांगोला/प्रतिनिधी

सांगोला-पंढरपूर राज्य मार्गावर मांजरी गावाजवळ झालेल्या अपघातात मेथवडे येथील एका व्यक्तींचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास घडली. बालाजी दशरथ ताटे (वय ४५, रा. मेथवडे) असे मयताचे नाव आहे.

ताटे हे आपल्या मोटारसायकलवरून मांजरी येथील ढाब्यावर जेवणासाठी गेले होते. जेवण करून परत गावी जात असताना सांगोला-पंढरपूर मार्गावर देवकते वाडीच्या फाट्याजवळ वळण घेत असलेल्या ट्रॅक्टरला ताटे यांच्या मोटारसायकलची जोराची धडक बसली. या धडकेत ताटे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर त्यांना तात्काळ सुमारे १२ किलोमीटर अंतरावर असलेल्या सांगोला ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. याबाबत सांगोला पोलीस ठाण्यात माहिती देण्यात आली आहे. तपास सांगोला पोलीस करीत आहेत.

# जन्मदात्री इतक्या टोकाला का गेली; तान्हुल्याला विष पाजून जगही सोडली

### २५ वर्षीय आईची गळफास घेवून आत्महत्या

### १४ महिन्यांच्या अन्विकवर सोलापुरात उपचार; प्रकृती स्थिर

बार्शी/प्रतिनिधी

शहरातील आगळगाव रस्त्यावरील वाणी प्लॉट परिसरात एक हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. अंकिता वैभव उकिरडे (वय २५ वर्षे) हिने राहत्या घरात आपल्या १४ महिन्याचा मुलगा अन्वीकला विषारी द्रव्य पाजून स्वतः साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास समोर आली. उच्च शिक्षित घरातील ही आई इतक्या टोकाला का गेली,हा प्रश्न बार्शीकरांना पडला आहे.दिवसभरात कारण समोर आले नाही.

या घटनेत आईचा जागीच मृत्यू झाला असून, चिमुकला अन्वीक वैभव उकिरडे (वय १४ महिने) हा गंभीर अवस्थेत आहे. प्रथम बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले असून, पुढील उपचारासाठी त्याला सोलापूर येथे हलविण्यात आले आहे. त्याची प्रकृती बरी असल्याचे रात्री सांगण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत अंकिता हिचे लग्न वैभव विकास उकिरडे यांच्याशी चार वर्षांपूर्वी झाले होते. घटनेच्या वेळी घरातील सर्व सदस्य कामानिमित्त बाहेर गेले होते. अंकिता ही घरात आपल्या चिमुकल्या मुलासह एकटीच होती.



#### बाळाला टाकून का घेतला जगाचा निरोप

अंकिताचे पती वैभव हे आगळगावचे उपसरपंच आहेत. घरातील वातावरण चांगले होते.सासर व माहेरच्या मंडळींनी दिवाळी आनंदाने साजरी केली. हा प्रकार घडल्यानंतर वैभवच्या सासरच्या लोकांनी कुठलीही तक्रार केलेली नाही. तरी देखील अंकिताने हा विचार केला,हा प्रश्न साऱ्यांनाच भेडसावत आहे.

दरम्यान, नेहमीप्रमाणे घरकामासाठी आलेल्या सुनंदा नावाच्या महिलेला घरात कोणी दिसले नाही. तिने खिडकीतून पाहिले असता, अंकिता साडीच्या सहाय्याने सिलींग फॅनला गळफास घेतल्याचे दिसून आले, तर लहानगा अन्वीक बेशुद्ध अवस्थेत आढळला.

त्यानंतर त्यांनी शेजारी राहणारे नातेवाईक प्रतिक सतिष उकिरडे यांना घटनेची माहिती दिली. प्रतिक यांनी घटनास्थळी धाव घेतल्यावर घटनेची खात्री पटली आणि त्यांनी तत्काळ बार्शी शहर पोलीस ठाण्यात याची खबर दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला आहे.

आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# पंढरीच्या रेस्टहाऊसवर दोन गटात राडा

## पोलिसांच्या हस्तक्षेपाने पुढचा अनर्थ टळला

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूरच्या शासकीय विश्रामगृहात शुक्रवारी दुपारी दोन गटात प्रचंड राडा झाला. एकमेकांच्या अंगावर धावून जाणे, वादावादी, अरेरावी हातघाईला आलेली होती. पोलीस वेळीच आल्याने पुढचा अनर्थ टळला. या प्रकाराने वातावरण तंग बनले होते मात्र पोलिसांनी स्थिती लगेच नियंत्रणात आणली

झाले असे की, ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके हे शासकीय विश्रामगृहात आले होते.त्याचवेळी तिथे मराठा क्रांती मोर्चाची बैठक आयोजित करण्यात आली होती. क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते घोषणाबाजी करत निघाले होते.त्यावेळी हाके यांचे समर्थक आणि मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक धनाजी साखळकर यांच्यात जोरदार वाद झाला.दोघांमध्ये बाचाबाची झाली. त्यावेळी दोन्ही बाजूचे कार्यकर्ते एकमेकांच्या अंगावर धावून गेले. शेवटी वरिष्ठ पोलिस



अधिकाऱ्यांनी घटनास्थळी दाखल होऊन हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला.

हाके हे माध्यमांशी संवाद साधण्यासाठी पंढरपुरात आले होते. शासकीय विश्रामगृहावर हाके हे उभे होते. त्याचवेळी साखळकर आणि त्यांचे कार्यकर्तेही त्या ठिकाणी दाखल झाले. मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली. मराठा क्रांती मोर्चाच्या घोषणाबाजीनंतर धनगर समाजाचे कार्यकर्तेही त्या ठिकाणी दाखल झाले. त्यात माऊली हाळवणकरही होते. त्यांच्यामध्ये हमरीतुमरी झाली. एकमेकांचा एकेरी उल्लेख करून दोन बाजूंनी हमरीतुमरी सुरू होती, त्यामुळे वातावरण संतप्त झाले होते. तुमच्या प्रेसच्या वेळी आम्ही घोषणाबाजी केली का, असा प्रश्न हाके यांनी केला. त्यावेळी साखळकर यांनी आमचीही प्रेस होती, असे सांगितले. आताच का आला येथे, असे हाके म्हणताच मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक होत हाके यांच्यावर हल्लाबोल केला.

#### आमच्याकडे माणसे नाहीत का

मी आदरार्थी बोलतो, तू अरे तुरे बोलू नको, असे साखळकर यांनी म्हटले, त्यावर प्रेस चालू असताना घोषणा का दिल्या, असा सवाल हाकेंनी केला. त्यावर आम्ही घोषणा देणार, तू आरं तुरं बोलू नको, असे मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांनी हाकेंना सुनावले. आमच्याकडं माणसं नाहीत का, असा सवाल दोन्ही बाजूंनी करण्यात आला. त्यावेळी मराठा क्रांती मोर्चाच्या एका पदाधिकाऱ्याने दलाल, दलाल असा उल्लेख केला, त्यामुळे वातावरण तापले. घोषणाबाजी आणि एकमेकांच्या अंगावर धावून जाण्याच्या प्रकारामुळे अनर्थ घडण्याचा धोका निर्माण झाला होता. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होऊन वेळीच हस्तक्षेप केला, त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

### डॉक्टर वळसंगकर आत्महत्या प्रकरण

## मनीषा मुसळेच्या दोषमुक्तीच्या अर्जाला सरकारी पक्षाची हरकत

सोलापूर/प्रतिनिधी



डॉ.सतीष वळसंगकर मनीषा मुसळे

डॉ.सतीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणातील आरोपी मनीषा मुसळे-माने हिने सदर खटल्या कामी दोषमुक्त होऊन मिळण्याकरिता दाखल केलेला अर्जास सरकार पक्षाने म्हणणे सादर केले आहे. मनीषा मुसळे माने हिच्या दोषमुक्ती अर्जास सरकार पक्षाने शुक्रवारी झालेल्या सुनावणीत हरकत घेतली आहे.

या अर्जावर सविस्तर युक्तिवाद करण्याकरिता दि. २१ नोव्हेंबर ही तारीख देण्यात आली आहे मनीषा मुसळे माने हिचेमार्फत डॉक्टर शिरीष वळसंगकर, फिर्यादी व इतर साक्षीदार यांचे घटनेपूर्वी चे ५ महिन्याचे सीडीआर व टॉवर लोकेशन न्यायालयात सादर करण्याकरिता किंवा त्याचे जतन करण्याकरिता अर्ज दाखल करण्यात आला होता. सदर अर्जावर शुक्रवारी सरकार पक्षाने म्हणणे दाखल केले आहे, त्याबरोबर तपास अधिकाऱ्याचे म्हणणे देखील सादर करण्यात आले आहे. सरकार पक्षाच्या कथनानुसार तपास अधिकारी यांनी अर्जात नमूद सर्व साक्षीदारांचे सीडीआर व एसडीआर मिळवण्याकरिता पत्रव्यवहार केला असून सदर सीडीआर व एसडीआर प्राप्त होताच ते न्यायालयात सादर करण्यास तयार आहेत, असे म्हणणे मांडून सदर अर्जास देखील तीव्र हरकत घेतली असून अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

मनीषा मुसळे माने हिचा मोबाईल तपासाच्या वेळी पोलिसांनी जप्त केला होता,तो मिळण्याकरिता मनीषा हिने दाखल केलेल्या अर्जावरही सरकार पक्षाने म्हणणे दाखल केले असून मनीषा मुसळे माने हिस तिचा मोबाईल देण्यास सरकार पक्षाने हरकत घेतलेली आहे यात मनीषा मुसळे माने हिचे तर्फे ॲड. प्रशांत नवगिरे तर सरकारतर्फे प्रदीपसिंग राजपूत हे काम पाहत आहेत. हा खटला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांच्या न्यायालयात प्रलंबित आहे

## वादग्रस्त जमिनीचा व्यवहार अखेर रद्द

मुंबई/प्रतिनिधी

पुण्यातील कोंढवा जमीन घोटाळा प्रकरणी पार्थ पवार यांच्यावर गंभीर आरोप झाल्यानंतर आता हा व्यवहार रद्द करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री तथा पार्थ पवार यांचे वडील अजित पवारांनी व्यवहारासंदर्भात सायंकाळी पत्रकार परिषद बोलावून ही माहिती दिली. माझ्या माहितीनुसार हा व्यवहार रद्द करण्यात आला आहे,असे त्यांनी सांगितले. १८०० कोटींची शासकीय जमीन अवघ्या ३०० कोटींला पार्थ यांच्या एका कंपनींने विकत घेतली आणि स्टॅम्प ड्युटी वाचवून शासनाच्या तिजोरीला चुना लावला,असा आरोप करण्यात

## वादळ उठताच पाघंरूण घातले मुलासाठी दादा अखेर नमले

## स्वकीयांसह फॅमिलीला खडे बोल सुनावले



### मुख्यमंत्र्यांसोबत ४० मिनिटे चर्चा

अजित पवार यांनी दिवसभरात दोनवेळा मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आहे. पहिल्यांदा अजित पवार आज दुपारी बारा वाजता वर्षा बंगल्यावर गेले होते. पण त्यांची भेट होऊ शकली नव्हती. त्यानंतर अजित पवार वरळी डोमला माघारी परत होते. त्यानंतर पुन्हा दुपारी ते मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी गेले. त्यांच्यासोबत सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल होते. यावेळी चारही नेत्यांमध्ये जवळपास ४० मिनिटे चर्चा झाली. या भेटीत जमीन व्यवहारावर चर्चा झाल्याची माहिती आहे. खरेतर ही शासनाची जमीन आहे. ती अशाप्रकारे लाटता येत नाही. यामध्ये अनियमतता दिसत आहे. त्यामुळे ही जमीन आता परत करावी लागणार आहे. हे प्रकरण अजित पवारांना अडचणीत आणताना दिसत आहे. त्यामुळे ही जमीन परत करण्याची घोषणा कदाचित अजित पवार करण्याची शक्यता आहे.ती अखेर खरी ठरली.

भावनांना वाट मोकळी करून दिली. आता, याप्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली असून ही समिती संपूर्ण चौकशी करेल, त्यात सर्व घटनाक्रम पुढे येईल. कोणी मदत केली, कुणाचे फोन गेले हे सगळे समोर येईल. मी नेहमीच माझ्या स्वकीयांना, नातेवाईकांनाही सांगतो, नियमाच्या बाहेर जाऊन केलेले मला चालणार नाही, अशा शब्दात अजित पवार यांनी स्वकीयांसह फॅमिलीला

(पान ९ वर...)

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




चेंडू रिव्हर्स पडला !

संगम श्री डे
688-26-123

संगम श्री नाईट
447-53-346

कल्याण
578-05-258

मुंबई
269-79-289

# निवडणुकीसाठी भाजपची जोरदार मोर्चेबांधणी

## प्रत्येक नगर परिषेदसाठी निवडणूक प्रभारींची नियुक्ती

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील ११ नगरपालिका आणि १ नगरपंचायतीसाठी भाजपने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. भाजपने प्रत्येक ठिकाणासाठी स्थानिक निवडणूक प्रभारींची नियुक्ती केली आहे, ज्यात बहुतेक प्रभारी संघ परिवारातून तयार झालेले कार्यकर्ते आहेत. अकलूजसाठी अनंत राऊत, मोहोळसाठी सुशील क्षीरसागर, पंढरपूरसाठी प्रणव परिचारक, आणि अनगरसाठी बाळराज पाटील यांच्याकडे जबाबदारी दिली आहे.

सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट, अकलूज, बार्शी, दुधनी, करमाळा, कुर्डूवाडी, मैंदर्गी, मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर, सांगोला या अकरा नगरपालिका आणि अनगर या नगरपंचायतीसाठी निवडणूक होत आहे. नगरपालिकेच्या निवडणुका स्वबळावर लढविण्याचा निर्णय भारतीय जनता पक्षाचे पूर्व विभागाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण आणि पश्चिम विभागाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी नुकतेच जाहीर केले आहे. त्यामुळे भाजपकडून संघटनात्मकदृष्ट्या व्यूहरचना करण्यास सुरुवात केली आहे गुरुवारी जिल्हा निवडणूक प्रभारींच्या नियुक्ता जाहीर केल्यानंतर शुक्रवारी नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी स्थानिक पातळीवर प्रभारी नेमण्यात आले आहेत. यामध्ये पंढरपूरसाठी प्रणव परिचारक, मोहोळसाठी सुशील क्षीरसागर, मोहिते पाटलांच्या बालेकिल्ला असलेल्या अकलूजसाठी संघ परिवारातील अनंत राऊत, तर अनगर नगरपंचायतीसाठी बाळराजे पाटील यांच्याकडे निवडणूक प्रभारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. मोहोळमध्ये राजन पाटील समर्थकाच्या ऐवजी मूळ भाजपचे असलेले सुशील क्षीरसागर यांची प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे.

#### अकलूजमध्ये मोहिते पाटलांना वळगून मोर्चेबांधणी

या प्रभारींची नियुक्ती करतना भाजपने पक्षातील निष्ठावंतांवरच ही महत्वपूर्ण जबाबदारी सोपविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यात मोहिते पाटील यांचा बालेकिल्ला असलेल्या अकलूज नगरपरिषेदेचे प्रभारी म्हणून संघ स्वयंसेवक असलेले अनंत राऊत यांची नियुक्ती केली आहे. राऊत यांची नियुक्ती करून भाजपने मोहिते पाटील यांना वगळून निवडणुकीच्या दृष्टीने मोर्चेबांधणी सुरू केल्याचे स्पष्ट होत आहे.

#### असे आहेत निवडणूक प्रभारी

अक्कलकोट–शिवशरण जोजन, अकलूज– अनंत राऊत, बार्शी–रवी माळवे, दुधनी–प्रदीप पाटील, करमाळा–शशिकांत कल्याणी, कुर्डूवाडी– विजय बाबर मैंदर्गी–प्रदीप मल्लिनाथ पाटील, मंगळवेढा–राजेंद्र सुरवसे मोहोळ– सुशील क्षीरसागर, पंढरपूर– प्रणव परिचारक सांगोला–संभाजी वरपे, अनगर – विक्रांत ऊर्फ बाळराजे पाटील.